# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

MMRDA
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
वांद्रे-कुर्ला संकूल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
**दूरध्वनी क्र.- ०२२-२६५९४००० फॅक्स : ०२२-२६५९१२६४**
वेबसाईट : **https://mmrda.maharashtra.gov.in**

## जाहिर निवेदन

मुंबई महानगर प्रदेश विकास प्रधिकरणाने नविन मुंबई महानगर प्रादेशिक योजना माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये प्रसिध्द केली व त्यासंबंधी हरकती व सूचना जनतेकडून मागविल्या. प्राप्त झालेल्या लेखी हरकती व सूचना यासंबंधीची सुनावणी सध्या चालू आहे. प्राप्त झालेल्या लेखी हरकती व सूचना तसेच आतापर्यंत झालेल्या सुनावणीवरुन असे दिसून येते की, प्रादेशिक योजनेच्या व्याप्ती संबंधी जनतेमध्ये काही संभ्रम आहेत. असे संभ्रम दूर करण्यासाठी खालील स्पष्टीकरण देण्यात येत आहे.

### स्पष्टीकरण

प्रादेशिक योजनेमधील प्रस्तावित भूवापर तसेच विकास नियंत्रण नियमावली ज्याठिकाणी महानगरपालिका, नगरपरिषदा आणि विशेष नियोजन प्राधिकरण यांच्या कार्यक्षेत्रात जेथे विकास आराखडा (DP) अस्तित्वात आहे त्या ठिकाणी लागू होणार नाहीत. हे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये प्रसिध्द झालेल्या प्रादेशिक योजनेतील प्रस्तावित भूवापर नकाशावर व विकास नियंत्रण नियमावलीमध्येही स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

ज्यांनी त्यांच्या हरकती व सुचना वरील स्पष्टीकरण लक्षात न घेता सादर केल्या असतील त्यांनी कृपया वरिल सपष्टीकरणाची नोंद घ्यावी व त्यानंतर सुद्धा त्यांना काही मुद्दयांवर अधिक माहिती घ्यावयाची असल्यास त्यांनी सुनावणीसाठी हजर रहावे.

**दिनांक : २१/०६/२०१७**
**ठिकाण : मुंबई**

**यु.पी.एस. मदान**
**महानगर आयुक्त**